CNR-MHBU11-000608-2021

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २०/०८/२०१९ |
| नोंदणी दिनांक | : | २०/०८/२०१९ |
| निकाल दिनांक | : | ०८/०४/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिना दिवस<br>०६ ०७ १९ |

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांच्या न्यायालयात**
**(सदस्य :– पुरुषोत्तम भा. जाधव.)**

**मोटार अपघात दावा क्र. २१९/२०२१** **निशाणी क्र. ४८**
**(जुना मो.अप. दावा क्र. १६२/२०१९)**

१) **कुणाल अशोक फिरके,**
वय अंदाजे ३० वर्ष, व्यवसाय – शेती,
राहणार अनुराबाद, तालुका, मलकापूर,
जिल्हा बुलढाणा.

२) **सौ. प्रिती गजानन चौधरी,**
वय अंदाजे ३४ महिने, व्यवसाय – घरकाम,
राहणार जळगांव खान्देश.

३) **सौ. शिल्पा चेतन पाटील,**
वय अंदाजे २८ वर्ष, व्यवसाय – घरकाम,
राहणार ह.मु. पुणे.

४) **लिलाबाई लहू फिरके,**
वय अंदाजे ८५ वर्ष, व्यवसाय – काही नाही,
राहणार अनुराबाद, तालुका, मलकापूर,
जिल्हा बुलढाणा.

**... अर्जदार/ दावेदार.**

**–विरुध्द–**

**सदस्य मो.अ. दावा न्या.**

| | |
|---|---|
| १) **मे. सोलर इंडस्ट्रीज इंडीया लि.,**<br>पत्ता – चाकडोह खुर्द, नं. ३७/३९, ७८-८३,<br>अमरावती रोड, पो. बाजारगांव, तालुका काटोल,<br>जिल्हा नागपूर.<br><br>२) **युनायटेड इंडीया इन्शोरन्स कंपनी,**<br>पत्ता – 'माईया', पहिला मजला, डी.के. मंगल<br>कार्यालयाजवळ, खामगांव, तालुका खामगांव,<br>जिल्हा बुलढाणा. | **... सामनेवाला.** |

---

| | | |
|---|---|---|
| **अर्जदारांतर्फे विधीज्ञ** | :- | **श्री. के.व्ही. परमार.** |
| **सामनेवाला क्र. १ तर्फे विधीज्ञ** | :- | **श्री. एम.एस. पाटील.** |
| **सामनेवाला क्र. २ तर्फे विधीज्ञ** | :- | **श्री. डी.एस. चव्हाण.** |

---

## न्यायनिर्णय

**(पारीत दिनांक – ०८ एप्रिल, २०२६)**

मयत अशोक लहु फिरके यांचा मुलगा, दोन मुली आणि आई यांनी मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १६६ अन्वये मोटार अपघात नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

**अर्जदारांचे प्रकरण थोडक्यात येणेप्रमाणे –**

२) तारीख २०/०५/२०१९ रोजी दुपारी ०२:२० वाजेच्या सुमारास

मयत अशोक आणि इतर महिंद्रा मॅक्सिमो वाहन क्र. एमएच ४६ – एक्स ७९२५ ने प्रवास करत असताना सदरचे वाहन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरून रसोया फॅक्टरीजवळ पोहोचले असता, समोरून येणारे कंटेनर वाहन क्र. एमएच ४० – बीजी ९११२ च्या चालकाने सदरचे कंटेनर वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, रस्त्याचा परिस्थितीचा विचार न करता चालवून सदर मॅक्सिमो वाहनास समोरून धडक दिली. सदर अपघातात मयत अशोकसह इतर काही प्रवासी मृत्यू पावले तर काही प्रवासी जखमी झाले. सदर अपघाताबाबत पोलीस उपनिरीक्षक श्री. शैलेश पवार यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन मलकापूर शहर येथे कंटेनरचे चालक श्री. कैलास जाधव यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३०४अ, २७९, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ अन्वये अपराध क्र. २४०/२०१९ दाखल करण्यात आला. सामनेवाला क्र. १ सदर कंटेनरचे मालक असून सदरचे वाहन सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत आहे, त्यामुळे अर्जदार सामनेवाल्यांकडून नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

३) अर्जदारांचे पुढे असेही प्रकरण आहे की, मयत अशोक यांचेवर सर्व अर्जदार अवलंबित होते. तिचे वय ६० वर्ष होते. त्यांच्याकडे पाच ते सहा एकर उच्च प्रतीची बागायती शेतजमीन होती. त्यापासून ते खर्च वजा जाता दरवर्षी पाच ते सहा लाख रुपये उत्पन्न मिळवत होते, त्याचप्रमाणे ते एस.एन.फिरके या दुकानावर अकाउंटंट म्हणून कामाला होते व त्यांना रुपये दहा हजार पगार होता. त्यांचे

भविष्यातील उत्पन्न वाढले असते. अर्जदारांनी एकूण रक्कम रुपये दहा लाखच्या नुकसान भरपाईचे मागणी केलेली आहे.

४) कंटेनर वाहनाचे मालक सामनेवाला क्र. १ यांनी निशाणी क्र. १६ वर आपला लेखी जबाब देऊन अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यांनी प्रथमतः अर्जातील सर्व मजकूर नाकबूल केला आहे. त्यांनी त्यांच्या अधिकच्या जबाबात असे नमूद केले आहे की, सामनेवाला क्र. १ सदर कंटेनरचा मालक असून सदरचे वाहन सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत केलेले केलेले होते. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचे ठरविल्यास ती अदा करण्याची जबाबदारी सामनेवाला क्र. २ यांची आहे. त्यांचे पुढे असेही म्हणणे आहे की, कंटेनरचा चालक सदरचे वाहन संतुलित वेगाने व मोटार वाहन नियमांचे पालन करून चालवत होता व अपघातात कंटेनर चालकाचे कोणतीही चूक नव्हती. उलटपक्षी मॅक्सिमो वाहनाच्या चालकाने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने वाहन चालवल्याने अपघात झालेला आहे. त्यामुळे सामनेवाला नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाही. गुन्हा दाखल झाल्याचे सुद्धा सामनेवाला क्र. १ यांनी नाकारले आहे. सर्व कारणास्तव त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५) सामनेवाला क्र. २ यांनी सुद्धा निशाणी क्र. १८ वर लेखी जबाब देऊन अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यांनी सुद्धा प्रथमतः अर्जातील सर्व मजकूर नाकबूल केला आहे. मयत अशोकचे वय, व्यवसाय, उत्पन्न आणि त्यांच्यावरील

अर्जदारांचे अवलंबित्व सामनेवाला क्र. २ यांनी नाकारले आहे. त्याचप्रमाणे घटनास्थळ पंचनामा प्रमाणे अपघात रस्त्याच्या मधोमध घडला असल्याने दोन्ही वाहने समोरासमोर धडकेमुळे अपघात झाल्याचे दिसून येत असल्याचे व त्यामुळे सदरचा अपघात मॅक्सिमो वाहनाच्या चालकाच्या चुकीमुळे घडल्याचे दिसून येत असल्याचे सामनेवाला क्र. २ यांचे म्हणणे आहे. मॅक्सिमो वाहनातील प्रवासी यांचे पत्ते पाहता ते वेगवेगळ्या ठिकाणी राहणारे असल्याचे दिसून येते. त्यामुळे मॅक्सिमो वाहन चालक बेकायदेशीरपणे प्रवासी वाहतूक करत होते व सदर अपघातात मॅक्सिमो वाहन चालकाचा सुद्धा मृत्यू झाला आहे.

६) सामनेवाला क्र. २ यांचे असेही म्हणणे आहे की, कंटेनर चालकाकडे वाहन चालवण्याचा वैध परवाना होता आणि सदर वाहनास जड वाहतूक करण्यासाठीचे फिटनेस प्रमाणपत्र होते, हे सामनेवाला क्र. १ यांनी सिद्ध केले पाहिजे. अर्जदारांनी मॅक्सिमो वाहनाचे मालक व विमा कंपनी यांना पक्षकार केले नसल्याने प्रस्तुत प्रकरणास आवश्यक पक्षकार न केल्याची बाधा येत असल्याचे सामनेवाला क्र. २ यांचे म्हणणे आहे. या सर्व कारणास्तव सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा आणि दोन्ही वाहनांच्या चालकांच्या दोषामुळे अपघात झाल्याचे सिद्ध झाल्यास सामनेवाला क्र. २ यांच्यावर ५०% नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी ठेवण्यात यावी, असेही सामनेवाला क्र. २ यांच्या म्हणणे आहे.

७) उपरोक्त परिस्थितीत निशाणी क्र. १९ वर खालील प्रमाणे मुद्दे

काढण्यात आले असून त्याखाली नमूद कारणांसाठी त्यावर निष्कर्ष नोंदवण्यात येतात, ते येणेप्रमाणे —

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वाहन क्र. एमएच ४० — बीजी ९११२ हे गुंतलेल्या अपघातात मयत अशोक लहू फिरके राहणार अनुराबाद, तालुका मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांचा मृत्यू झाला, हे अर्जदारांनी सिद्ध केले का? | ... सकारात्मक |
| २. | सदरचा अपघात मोटार वाहन क्र. एमएच ४० — बीजी ९११२ च्या चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजेपणाने वाहन चालवल्यामुळे घडला, असे अर्जदाराने सिद्ध केले का? | ... सकारात्मक |
| ३. | अपघाताच्या दिवशी मयत अशोकचे वय व उत्पन्न काय होते? | वय ६० वर्ष, उत्पन्न रुपये ९,०००/— प्रतिमहा. |
| ४. | सदरचे वाहन सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत होते का? | ... होय. |
| ५. | विमा पॉलिसीच्या अटी-शर्तींचा भंग झाला आहे, असे विमा कंपनीने सिद्ध केले का? | ... नाही. |
| ६. | अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत का? असल्यास किती आणि नुकसान भरपाई देण्यास कोण जबाबदार आहे? | ... होय, सामनेवाला क्र. २, रक्कम रुपये ५,८८,९००/- |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ७. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणेमीमांसा

८) अर्जदारांनी अर्जाच्या पृष्ठ्यर्थ अर्जदार क्र. १ कुणाल यांची निशाणी क्र. २२ वर आणि अपघाताचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून रोहीत नथ्थू चौधरी यांची निशाणी क्र. २२अ वर साक्ष घेतली असून त्यांनी निशाणी क्र. २५ ते ४५ वरील कागदपत्रांवर भिस्त ठेवली आहे. अधिकचा पुरावा देणे नसल्याबद्दल अर्जदारांनी निशाणी क्र. ४७ वर पुरसीस दाखल केली आहे.

९) दोन्ही सामनेवाल्यांना वारंवार संधी देऊनही त्यांनी कोणताही पुरावा न दिल्यामुळे प्रकरण त्यांच्या पुराव्याशिवाय चालेल, असा आदेश सामनेवाला क्र. १ विरुद्ध तारीख १८/०२/२०२६ रोजी आणि सामनेवाला क्र. २ विरुद्ध तारीख ११/०३/२०२६ रोजी निशाणी क्र. १ खाली करण्यात आला.

१०) अर्जदारांचे विद्वान वकील श्री. के.व्ही. परमार, सामनेवाला क्र. १ चे विद्वान वकील श्री. एम.एस. पाटील आणि सामनेवाला क्र. २ चे विद्वान वकील श्री. डी.एस. चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले.

**मुद्दा क्र. १ ते ७ करिता :-**

**११)** तारीख २०/०५/२०१९ रोजी दुपारी ०२:२० वाजेच्या सुमारास महिंद्रा मॅक्सिमो वाहन क्रमांक एमएच ४६ – एक्स ७९२५ आणि कंटेनर वाहन क्रमांक एमएच ४० – बीजी ९११२ या दोन्ही वाहनांमध्ये अपघात झाला, सदरचा अपघात कंटेनर चालकाने कंटेनर वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवल्यामुळे सदर अपघात झाला, सदर अपघातात महिंद्रा मॅक्सिमो या वाहनाच्या चालकाची कोणतीही चूक नव्हती, त्यामुळे मॅक्सिमो वाहन मालक व विमा कंपनी हे आवश्यक पक्षकार ठरत नाहीत व त्यामुळे आवश्यक पक्षकार न केल्याची बाधा प्रकरणास येत नाही, कंटेनर हे वाहन सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत आहे व विमाच्या पॉलिसीच्या अटी-शर्तींचा भंग झालेला नाही, असे निष्कर्ष याच अपघातात मयत झालेल्या छाया गजानन खडसे यांचे मुलगा, मुलगी आणि सासू-सासरे यांनी दाखल केलेल्या मोटार वाहन नुकसान दावा अर्ज क्र. २१८/२०२१ (तेजस गजानन खडसे व इतर -विरुद्ध- मे. सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेड व इतर) या प्रकरणात याच न्यायालयाने नोंदवलेले आहेत. त्याचप्रमाणे सामनेवाला क्र. २ हे त्या प्रकरणातील अर्जदारांना नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत, असेही या न्यायालयाने त्या प्रकरणात निष्कर्ष नोंदवला आहे. त्याच अपघातात या प्रकरणातील मयत अशोक लहू फिरके हे मृत्यू पावले याबाबत कोणताही वाद नाही. उपरोक्त संदर्भात या प्रकरणातील अर्जदारांचाही त्या प्रकरणातील पुराव्याप्रमाणेच पुरावा व प्रकरण आहे. त्यामुळे

प्रस्थापित न्यायतत्त्वांच्या अनुषंगाने त्याच प्रमाणे निष्कर्ष या प्रकरणात नोंदवणे आवश्यक आहे. एकाच अपघातात मयत व जखमी झालेल्या व्यक्तींच्या संदर्भात मोटार अपघात नुकसान दावे दाखल झाले असल्यास त्या प्रकरणात एकसारखेच निष्कर्ष नोंदवणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद सामनेवाला व अर्जदार यांच्यातर्फेच करण्यात आलेला आहे. या कारणास्तव मुद्दा क्र. १, २, ४ व ५ यांच्यावर निष्कर्ष नोंदवण्यात येतात. त्याचप्रमाणे मुद्दा क्रमांक ६ वर सामनेवाला क्र. २ हे नुकसान भरपाई देण्यात जबाबदार आहेत असाही निष्कर्ष नोंदवण्यात येतो.

१२) उपरोक्त परिस्थितीत या प्रकरणी अर्जदारांना नुकसान भरपाई किती मिळू शकते, हेच फक्त ठरवणे आवश्यक आहे. प्रथमतः मृतक अशोक यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या उत्पन्नातील नुकसानी ठरवण्यासाठी त्यांचे उत्पन्न, वय, त्यांची वैवाहिक स्थिती, त्यांच्या उत्पन्नातील भविष्यातील वाढ, त्यांच्यावर अवलंबतांची संख्या इत्यादी बाबी पाहणे आवश्यक आहे.

१३) प्रथमतः मृतक अशोक यांच्या उत्पन्नाबाबत पुरावा पाहणे योग्य ठरेल. मयत अशोक यांच्याकडे पाच ते सहा एकर उच्च प्रतीचे बागायती शेतजमीन होती, त्यापासून ते खर्च वजा जाता दरवर्षी पाच ते सहा लाख रुपये उत्पन्न मिळवत होते, त्याचप्रमाणे ते एस.एन. फिरके या दुकानावर अकाउंटंट म्हणून कामाला होते व त्यांना रुपये दहा हजार पगार होता, असा पुरावा अर्जदारांच्या साक्षीदार क्र. १

कुणाल फिरके यांनी निशाणी क्र. २२ वर दिला आहे. सदर पुराव्यास सामनेवाला क्र. २ यांनी उलटतपासणीत आव्हान दिले आहे. त्यामुळे सदरची बाब अर्जदारांनी सबळ पुराव्यानिशी सिद्ध करणे आवश्यक आहे. मयत अशोक हे दुकानात अकाउंटंट म्हणून काम करत होते, याबाबत सदर दुकानदाराचा तोंडीपुरावा अथवा नोकरीबाबत लेखी पुरावा अर्जदार दाखल करू शकले असते मात्र तसा कोणताही लेखी अथवा तोंडीपुरावा त्यांनी दाखल केलेला नाही त्यामुळे मयत अशोक हे दुकानात अकाउंटंट म्हणून काम करत होते व त्यापासून त्यांना काही उत्पन्न होते ही बाब सिद्ध झाली असे म्हणता येणार नाही.

**१४)** मयत अशोक यांच्याकडे बागायती शेती होते हे सिद्ध करण्यासाठी अर्जदारांनी निशाणी क्र. ३८ ते ४३ वर सातबारा उतारा आणि खाते उतारा दाखल केलेले आहेत. त्यावरून अशोक यांच्याकडे सामाईकातील एकूण सुमारे तीन हेक्टर शेत जमीन होती, ही बाब सिद्ध होते. मात्र त्या शेतजमिनीपासून मयत अशोक यास नेमके किती उत्पन्न होते याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. मात्र मयत अशोक यांच्याकडे सदर शेतीशिवाय इतर उत्पन्नाचे काही साधन होते असे सामनेवाल्यांचे म्हणणे नाही. त्यामुळे सदर शेतीच्या उत्पन्नावरच मयत अशोक याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता हा अर्जदारांचा युक्तीवाद योग्य वाटतो. मयत अशोक यांच्या मृत्यूनंतर सदरची शेती अर्जदारांकडे आलेली आहे याबाबत वाद असण्याचे कारण नाही. सदरच्या शेतीची देखभाल मयत अशोक हे करत होते असे ठरवता येईल. त्याचप्रमाणे अशोक

यांच्या मृत्यूमुळे पर्यवेक्षीय तोटा झाला असे ठरवावे लागेल. सदरच्या तोट्याची रक्कम अंदाजाने ठरवावी लागेल. अर्जदार व मयत अशोक हे ग्रामीण भागातील रहिवासी असून ग्रामीण भागातील शेती संदर्भाने विचार करत असताना मयत अशोक यांच्या मृत्यूमुळे रुपये ९,०००/– प्रतिमाह पर्यवक्षित तोटा झाला असे ठरविल्यास ते योग्य व न्यायोचीत होईल. म्हणून मयत अशोक यांच्या मृत्यू संदर्भात नुकसान भरपाई ठरवताना त्यांचे उत्पन्न रुपये ९०००/– प्रतिमाह ठरवण्यात येते. म्हणजेच त्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये १,०८,०००/– येईल

**१५)** मयत अशोक यांचे वय ६० वर्षे होते, असे अर्जदारांचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे अर्जदारांचे साक्षीदार क्र. १ कुणाल यांनी त्यांच्या पुराव्यात नमूद केले आहे. मयत अशोक यांचा मरणोत्तर पंचनामा निशाणी क्र. २८ आणि शवविच्छेदन अहवाल निशाणी क्र. ३० यात मयत अशोक यांचे वय ५८ वर्ष नमूद केलेले आहे. सर्व पुराव्याचा विचार करता मयत अशोक हे ५६ ते ६० वर्ष वयोगटातील होते हे सिद्ध होते. त्यामुळे नुकसान भरपाई ठरवण्यासाठी याप्रकरणी गुणांक ९ येईल. नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सरला वर्मा –विरुद्ध– दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (२००९ एसीजे १२९८)** या निर्णयानुसार मोटार वाहन नुकसान भरपाई ठरवण्यासाठीचा मयत अशोक यांचे वय ५६ ते ६० वयोगटातील असल्याने गुणांक ९ येतो.

**१६)** अर्जदार क्र. १ ते ४ हे अनुक्रमे मयत अशोकचा मुलगा, मुलगी,

मुलगी आणि आई आहेत. त्यापैकी दोन्ही मुलींचे लग्न झालेली आहेत. त्यामुळे मयत अशोक यांच्यावर अर्जदार क्र. १ हा मयत अशोक यांचा मुलगा आणि अर्जदार क्र. ४ या मयत अशोकच्या आई अश्या दोन व्यक्ती अवलंबून होत्या हे सिद्ध होते. मयत अशोक हे विवाहित होते. त्यामुळे मयत अशोक यांच्या वैयक्तिक खर्च म्हणून ५०% रक्कम त्यांच्या उत्पन्नातून नुकसान भरपाई ठरवताना वजा करावी लागेल.

**१७)** वरील चर्चेच्या अनुषंगाने मयत अशोक यांचे वार्षिक उत्पन्न रुपये १,०८,०००/— असल्याने व गुणांक ९ असल्याने एकूण उत्पन्नाचे नुकसान रुपये ९,७२,०००/— होते आणि त्यातून त्यांच्या वैयक्तिक खर्चापोटी ५०% वजावट केल्यानंतर उत्पन्न नुकसान भरपाईची रक्कम रुपये ४,८६,०००/— येते.

**१८)** मयत अशोक यांचे वय ५६ ते ६० वयोगटातील असल्याचे लक्षात घेता स्थापित न्यायतत्वाच्या अनुषंगाने त्यांच्या उत्पन्नात १५% वाढ झाली असती, हे गृहीत धरणे आवश्यक आहे. त्यानुसार त्यांच्या उत्पन्नात भविष्यातील वाढ म्हणून रक्कम रुपये ७२,९००/—, मिळवणे आवश्यक आहे. सदरची रक्कम मिळवल्यानंतर त्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न नुकसान भरपाई रक्कम रुपये ५,५८,९००/— होते.

**१९)** उपरोक्त नुकसान भरपाई व्यतिरिक्त मृतक अशोक यांच्या वाहन

अपघातातील मृत्यूमुळे त्यांचे अवलंबित म्हणजे अर्जदारांच्या संपत्तीचे नुकसान (Loss of Estate ) आणि अंतिम संस्काराचा खर्च सुद्धा मिळण्यास अर्जदार पात्र ठरतात. या सदरांखाली प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/— देण्यात यावे, हे स्थापित न्यायतत्त्व आहे. त्याचप्रमाणे नामदार सर्वोच्च न्यायालयाचे **नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड –विरुद्ध– प्रणय सेठी, [२०१७ (१६) एसएससी ६८०]** या प्रकरणातील न्यायनिर्णयाप्रमाणे सन २०१७ पासून प्रत्येक तीन वर्षासाठी १०% वाढ सदर रकमेत देण्यात यावी असे नमूद केले आहे. प्रस्तुत प्रकरणातील अपघात सन २०१९ मध्ये झालेला असल्याने सन २०१७ नंतर तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला नाही. म्हणून संपत्तीचे नुकसान आणि अंतिम संस्कार खर्च या सदराखाली प्रत्येकी रुपये १५,०००/— मिळण्यास अर्जदार पात्र ठरतात.

२०) अर्जदार क्र. २ ते ४ हे मृतक अशोक यांचे विवाहित अपत्ये व आई आहे. अर्जदार क्र. १ चे वय ३० वर्षे आहे. मयत अशोक सुध्दा विवाहित होते. त्यामुळे मयत अशोक गमावल्याच्या वियोगामुळे स्थापित न्यायतत्त्वानुसार सदर वियोग नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरत नाहीत.

२१) मृत अशोक यांना अपघातानंतर दवाखान्यात दाखल केले होते व त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यात आला होता असे अर्जदारांचे म्हणणे नाही. त्यामुळे वैद्यकीय उपचाराचा खर्च मिळण्यास अर्जदार पात्र नाहीत.

**सदस्य मो.अ. दावा न्या.**

२२) उपरोक्त नुकसान भरपाईच्या रकमेशिवाय अन्य सदराखाली अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र असल्याचे अर्जदारांचे म्हणणे नाही. उपरोक्त सदराखालील पात्र ठरलेली नुकसान भरपाईची रक्कम येणेप्रमाणे –

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | अपघातात मृत्यू झालेल्या अशोक यांच्या उत्पन्नाची नुकसान भरपाई रक्कम | रु. | ५,५८,९००/- |
| ब. | संपत्तीचे नुकसान (Loss of estate) रक्कम | रु. | १५,०००/- |
| क. | अंतिम संस्कार खर्च | रु. | १५,०००/- |
| | **एकूण नुकसान भरपाईची रक्कम (अ+ ब+ क)** | **रु.** | **५,८८,९००/-** |

२३) येणेप्रमाणे अर्जदार मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरतात. सदर नुकसान भरपाईच्या रकमेवर अर्ज दाखल तारखेपासून रक्कम वसूल होईपावेतो बँक दराने व्याज देणे क्रमप्राप्त ठरते. सध्याचा बँक व्याजदराचा विचार करता वार्षिक सात टक्के दराने व्याज देणे योग्य व वाजवी ठरेल.

२४) भविष्यातील उत्पन्न वाढीवर व्याज देता येणार नाही असे सामनेवाल्यांचे म्हणणे आहे मात्र भविष्यातील उत्पन्न वाढ ही मानिव वाढ धरून नुकसान भरपाई ठरवण्यात येत असल्यामुळे सदरचा युक्तिवाद योग्य व संयुक्तिक नाही.

२५) प्रकरण २०१९ पासून प्रलंबित असून अर्जदाराने सदर प्रकरण चालवण्यास सकारात्मक पावले उचलली नाहीत, म्हणून संपूर्ण कालावधीसाठी व्याज मंजूर करण्यात येऊ नये असा युक्तिवाद सामनेवाला क्र. २ चे विद्वान वकील यांनी केला. हे खरे की, प्रस्तुच्या प्रकरण सन २०१९ मध्ये दाखल झाले होते. दरम्यानच्या काळात मलकापूर येथे स्वतंत्र न्यायाधिकरण झाल्याने प्रकरण बुलढाणा येथून मलकापूर येथे वर्ग करण्यात आले. माझे पूर्वपिठासन अधिकारी यांनी तारीख ०९/०३/२०२२ रोजी मुद्दे काढलेत, त्यानंतर प्रकरण पुराव्यासाठी ठेवण्यात आल्यावर १६/११/२०२२ रोजी अर्जदारांनी सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. सदर प्रकरणी दोन्ही पक्षकारांकडून मुदती घेण्यात आल्या व शेवटी सन २०२६ मध्ये पुरावा पूर्णपणे नोंदविण्यात आला. या परिस्थितीत सदर प्रकरण लांबणीवर पडण्यासाठी अर्जदाराची चूक आहे, असे म्हणता येणार नाही. त्यामुळे याप्रकरणी व्याज देऊ नये अशी मागणी सामनेवाल्यांना करता येणार नाही.

२६) अर्जदारांनी नुकसान भरपाईची रक्कम अधिक मागितली असली, तरी न्यायालयीन मुद्रांक मात्र कमी रक्कमेवर दिलेला आहे. मात्र योग्य व वाजवी मोटर अपघात नुकसान भरपाई ठरवण्याची जबाबदारी मोटार अपघात नुकसान भरपाई न्यायाधिकरण यांच्यावर असल्याने उर्वरित न्यायालयीन मुद्रांक अर्जदारांनी सादर करण्याच्या निर्देशासह नुकसान भरपाई देण्याचा हुकूम करणे न्यायच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे.

२७) अर्जदारांचे मृतक अशोक यांचेशी असलेले नाते, त्यांचे अवलंबित्व व त्यांचे वय लक्षात घेता अर्जदार क्र. १ ते ४ यांना नुकसान भरपाई पैकी प्रत्येकी २५% रक्कम देणे न्यायच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. सर्व अर्जदार आता सज्ञान आहेत. त्यामुळे नुकसान भरपाई रक्कमेपैकी कोणतीही रक्कम मुदत ठेवीत ठेवण्यात येवू नये, हा अर्जदारांच्या वि. वकीलांचा युक्तिवाद योग्य वाटतो.

२८) नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सुमोटो रिट पिटिशन क्र. ७/२०२५ मधील तारीख २२/०४/२०२५** च्या आदेशानुसार नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अर्जदारांनी त्यांचे आधार कार्डची प्रत, पॅन कार्डबद्दल माहिती, ई–मेल आणि बँक खात्याचा तपशील या आदेशापासून पंधरा दिवसाच्या आत देण्याचा हुकूम करणे आवश्यक ठरते.

२९) उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने प्रस्तुच्या मुद्द्यांवर निष्कर्ष नोंदवून खालील प्रमाणे आदेश करण्यात येतात –

## आदेश

१) मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज क्र. २१९/२०२१ खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) सामनेवाला क्र. २ यांनी अर्जदारांना नादोष नुकसान भरपाईच्या रकमेसह मोटार अपघात नुकसान भरपाई रक्कम रुपये ५,८८,९००/– (रक्कम रुपये

पाच लाख अठ्ठयांऐंशी हजार नऊशे मात्र) अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम वसूल होई पावेतो सदर रकमेवर दर साल दर शेकडा सात टक्के व्याजासह अदा करावी.

३) सामनेवाला क्र. २ यांनी नुकसान भरपाईची रक्कम या न्यायाधिकरणाच्या खालील बँक खात्यात जमा करावी व त्याबाबत खाली नमूद ई-मेलवर न्यायाधिकरणास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नाव | : | भारतीय स्टेट बँक. |
| शाखा | : | मलकापूर, जिल्हा बुलढाणा. |
| खाते क्रमांक | : | 40786745622. |
| आय.एफ.एस.सी. कोड | : | SBIN0000419. |
| ईमेल | : | mahbulmalsc@aij.gov.in |

४) नुकसान भरपाई रकमेपैकी प्रत्येकी २५% रक्कम अर्जदार क्र. १ ते ४ यांना देण्यात यावी.

५) अर्जदारांनी नियमाप्रमाणे उर्वरित मुद्रांक शुल्क १५ दिवसाच्या आत न्यायालयात सादर करावे.

६) नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सुमोटो रिट पिटिशन क्र. ७/२०२५ मधील तारीख २२/०४/२०२५** च्या आदेशानुसार नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अर्जदारांनी त्यांचे

आधार कार्डची प्रत, पॅन कार्डबद्दल माहिती, ई-मेल आणि बँक खात्याचा तपशील या आदेशापासून पंधरा दिवसाच्या आत न्यायाधिकरणास आत करावा.

७) अर्जदारांनी उर्वरित मुद्रांक शुल्क सादर केल्यानंतर अवार्ड करण्यात यावा.

८) येणेप्रमाणे अर्ज निकाली केला असे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PURUSHOTTAM BHAURAO JADHAV
Date: 2026.04.08 16:23:44 +0530

मलकापूर.
दिनांक – ०८/०४/२०२६.

**(पुरुषोत्तम भा. जाधव)**
सदस्य,
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
मलकापूर.

- - - - -

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करते की, या न्यायनिर्णयाची अपलोड केलेली पी.डी.एफ. फाइल ही मूळ स्वाक्षरी केलेल्या न्यायनिर्णयानुसार खरी आणि बरोबर प्रत आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :– | मोटार अपघात दावा न्यायाधिकारण, मलकापूर. |
| लघुलेखिकेचे नांव | :– | कु. एच.डी. चौधरी, लघुलेखक श्रेणी–१ |
| न्यायनिर्णय पारीत केल्याचा दिनांक | :– | ०८/०४/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०८/०४/२०२६. |